अतारांकित प्रश्नोत्तरांची ३९ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेबाबत

**(१) १६७ (२५-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक कल्याण आणि विशेष सहाय्य विभागामार्फत माहे जुलै, २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचे नवीन अर्ज स्विकारण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, आचारसंहिता संपल्यानंतर सदरील योजना कार्यान्वित करणे गरजेचे असतानाही माहे जानेवारी, २०२५ अखेर पर्यंत उक्त योजेनेचे अर्ज स्वीकारण्यास सुरवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ मध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखलदरा व धारणी (जि.अमरावती) येथील रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुरांची मजूरी प्रलंबित असल्याबाबत

**(२) ३२३ (२६-०४-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा व धारणी (जि.अमरावती) येथे रोजगार हमी योजनांवर काम करणाऱ्या मजुरांची मागील चार महिन्यांची ३० कोटी रुपयांची मजूरी थकीत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील अनुक्रमे रुपये ४२ हजार मजुरांची २० कोटी व रुपये ३० हजार मजुरांची १० कोटी एवढी मजूरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मजुरांना तात्काळ थकीत मजुरी

देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. भरत गोगावले (३०-०३-२०२६) :** (१) व (२) हे अशत: खरे आहे.

२०२४-२५ आर्थिक वर्षात प्रलंबित असलेली केंद्र शासनाकडून १०० दिवसाखालील मजुरी रक्कम रु. १३६७ लक्ष निधी दिनांक २१ एप्रिल, २०२५ पर्यंत वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच १०० दिवसावरील राज्य शासनाकडून प्राप्त झालेला रु. ८५ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रलंबित अकुशल निधीबाबत केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## मौ.शिवतर (ता.खेड,जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजना व शिवतर कोडबा या धरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत

**(३) ४८३ (२७-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.शिवतर (ता.खेड,जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजना व शिवतर कोडबा या धरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या वडिलोपार्जित जमिनीच्या आर्थिक नुकसानीबाबत मा.उपविभागीय अधिकारी, खेड यांनी दिलेल्या निर्णयामुळे माजी सैनिक, शेतकरी व जमिन मालकांवर अन्याय होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी आणि शिवतर ग्रामस्थ शिक्षण संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे तक्रार केल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०२४ व दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०३-२०२६) :** (१) व (२) मौ. शिवतर (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजना व शिवतर कोडबा या धरणाच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या आर्थिक नुकसानीबाबत शिवतर ग्रामस्थ शिक्षण संस्थेने दिनांक १९.१२.२०२४ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

मौ. शिवतर येथील संपादीत जागेच्या प्रारुप निवाड्यास उक्त संस्थेने घेतलेल्या आक्षेपाबाबत जिल्हाधिकारी यांच्या दिनांक २६.१२.२०२४ रोजीच्या संयुक्त बैठकीमध्ये सुधारीत मुल्यांकन करुन सदर निवाडा विभागीय आयुक्त, कोकण यांच्या मान्यतेने अंतिम केला आहे. तसेच दिनांक ०३.०३.२०२५ रोजी मंजूर केलेल्या अंतिम निवाड्यानुसार १९२ खातेदारांना मोबदला रक्कमही वाटप करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महसूल विभागामध्ये विविध संवर्गातील जागा रिक्त असल्याबाबत

**(४) ५५२ (०१-०५-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण**

**(अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागामध्ये विविध संवर्गातील जागा रिक्त असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तहसीलमध्ये अनेक जागा रिक्त असल्यामुळे सामान्य नागरिकांना प्रशासकीय कामासाठी विलंब लागत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून उक्त रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून मागणी केली जात असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासह संपूर्ण जिल्ह्यातील महसूल प्रशासनातील एकूण १८८१ मंजूर पदांपैकी मंडल अधिकारी, अव्वल कारकून व महसूल सहाय्यक अशी १८४ पदे रिक्त असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे

(२) होय, हे अंशत: खरे आहे

चंद्रपूर जिल्हयातील तहसील कार्यालय कोरपना येथील मंजूर ६२ पदांपैकी ४७ पदे भरली असून १५ पदे रिक्त आहेत. तथापि, कार्यरत कर्मचाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आले असल्याने नागरिकांची कामे विहित वेळेमध्ये पूर्ण केली जात असल्याने कुठल्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल आस्थापनेवर एकूण २०४१ पदे मंजूर असून दिनांक ३१.१.२०२५ अखेर २१४ पदे रिक्त आहेत. त्यापैकी गट-क संवर्गाची मंडल अधिकारी, अव्वल कारकून व महसूल सहाय्यक ३९ पदे रिक्त आहेत. सदरची पदे पदोन्नतीची पदे असून पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरची पदे रिक्त आहेत. सदर संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नतीने पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यात मातोश्री पाणंद रस्ते योजनेतंर्गत रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(५) ५७८ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मातोश्री पाणंद रस्ते योजना शासनाने सन २०२२-२३ या वर्षात अंमलात आणल्यानंतर वर्षभरात १६६२ पाणंद रस्त्यांना मंजूरी देण्यात आली असून त्या रस्त्यांच्या कामांपैकी केवळ २८ रस्तेच पूर्ण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच दरवर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रस्ते व जलसंधारण यासारखी विविध विकास कामे ग्रामीण भागात होत असून त्या माध्यमातून कायमस्वरुपी मत्ता निर्माण होतात तसेच ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजना केंद्र व राज्य शासनाकडून राबविल्या जात असून सदर योजनेवर मंजूर झालेल्या कामांचे कोड न देणे, कामांचा कोड देऊनही सुरु न करणे व नवीन कामांना मंजूरी न देणे इ. निर्बंध घालण्यात आले

आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्बंध दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी स्वरुपात दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) येथे मागील दोन वर्षांपासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्त्यांची कामे प्रलंबित असून मजुरांना मजुरीचे पैसे मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन मजुरांना कामाची मजुरी वेळेत मिळण्याबाबत तसेच मंजूर पाणंद रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) हे अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरीता तसेच, जिल्हास्तरावरील कुशल खर्चाचे प्रमाण ४०% च्या मर्यादेत राखण्याकरीता सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) होय.

(५) हे खरे नाही.

१.अक्कलकुवा तालुक्यात मातोश्री शेत/पाणंद रस्त्यांची ४६ कामे मंजुर असुन ५ कामे सुरु आहेत. तसेच, माहे, एप्रिल,२०२५ पर्यंतची अक्कलकुवा तालुक्यातील हजेरीपटांची देयके अदा करण्यात आली आहेत.

२. धडगाव तालुक्यात शेत/पाणंद रस्त्यांची १० कामे मंजूर आहेत परंतु ती अद्याप सुरु झाली नाहीत. मजुरांच्या मागणीनुसार कामे सुरु करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनपेठ (जि.परभणी) येथील शेतकऱ्यांना दळणवळणासाठी शेत रस्ता समितीची स्थापना करुन अहवाल सादर करण्याबाबत

**(६) ६२९ (२५-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ (जि.परभणी) येथील शेतकऱ्यांना दळणवळणासाठी शेत रस्त्यासह समृध्द गावांसाठी ग्रामस्तरिय शेत रस्ता समितीची स्थापना करुन समित्यांचा अहवाल शासनास सादर करण्याची मागणी अनेक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी (परभणी) यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे,

(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: लवेसू-२०२५/प्र.क्र. ४५८/भूमापन (ल-१), दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ अन्वये शेत रस्त्यांचे सीमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देणेबाबत कार्यपद्धती ठरवून देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामध्ये प्रत्येक गावातील ग्रामसेवक / ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी महसूल सेवक (कोतवाल) व त्या गावाचा पोलीस पाटील यांच्या मदतीने स्थानिक नागरिकांसह शिवार फेरी आयोजित करून रस्त्यांची यादी तयार करणे, गावनिहाय तयार करण्यात आलेली रस्त्यांची प्राथमिक यादी ग्रामसभेमध्ये सर्व ग्रामस्थांच्या माहितीसाठी ठेवणे, ग्रामसभेच्या मान्यतेनंतर अंतिम झालेली यादी ग्रामसभेच्या ठरावासह तहसीलदार यांच्याकडे सादर करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतूदीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ज्येष्ठांसाठी कल्याणकारी योजना महामंडळाच्या माध्यमातून राबविण्याबाबत**

**(७) ६६० (३०-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्येष्ठांसाठी कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता कर्तव्य अभियान राबविणे व ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा करुन या सर्व योजना महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात याव्या असे आदेश तत्कालिन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी माहे जुलै, २०२४ मध्ये दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करणे तसेच छळ पिळवणुकीपासून त्यांचे संरक्षण करणे त्यांना निवारा पुरविणे विमा कवच पुरवणे अशी उद्दिष्टे महामंडळाच्या वतीने ठरविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेष्ठ नागरिकांना रेल्वे तिकीट दरात देण्यात येणारी ४० टक्के सवलत कोविड-१९ नंतर बंद केली आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) तसेच नागपूर येथे ज्येष्ठांसाठी होणारे जेरायाटिक सेंटर ज्येष्ठ नागरीक धोरणानुसार समितीची अमंलबजावणी, इपीएस-९५ पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ आदी मुद्दे मागील काही वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून ज्येष्ठासाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (१४-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) ज्येष्ठ नागरिक महामंडळामार्फत ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यासाठी लेखाशिर्ष निर्माण करणे व इतर अनुषंगिक बाबींवर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील खडकवासला मंडल कार्यालयातील शेतकरी व नागरिकांचे विविध शासकीय अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(८) ८०३ (२८-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील खडकवासला मंडल कार्यालयातील नागरिकांचे शासकीय अर्ज वेळेत निकाली काढले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी व नागरिकांचे अर्ज जलद गतीने निकाली काढण्यासाठी मंडल कार्यालयात कोणत्या सुधारणा करण्यात येणार आहेत तसेच, मंडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाची नियमितपणे तपासणी व नागरिकांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या दिरंगाईला आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) मंडल अधिकारी यांचे स्तरावर अर्ज जलद गतीने निकाली काढणेकामी व नगरीकांचे जीवनमान सुकर करणेकामी ई-हक्क प्रणाली, EQJ-Court, ई-फेरफार प्रणाली इत्यादी उपक्रम राबविणेत येत आहेत.

(३) तसेच मंडल अधिकारी यांचेस्तरावरील प्रलंबित-कामकाजाचा उपविभागीय अधिकारी व तहसिलदार कार्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अरबी समुद्रामध्ये चायनिज मालवाहू जहाजाने तिसाई नौकाधारक बोटीस धडक दिल्याबाबत

**(९) १४४८ (२७-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रामध्ये चायनिज मालवाहू जहाजाने “तिसाई” नौकाधारक बोटीस दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान धडक दिल्यामुळे अपघात झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बोटीमध्ये अरबी समुद्राहून तळपशा बंदरावर दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान आणण्यात आली असून त्याच ठिकाणी पंचनामा केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चायनिज जहाज कंपनीकडून २० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व श्री.हेमदीप हरिश्चंद्र टिपरी यांनी मा.मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्री व आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांना आर्थिक मदत देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदर नौका तळपशा बंदरावर आल्यानंतर दिनांक २९/१२/२०२४ रोजी सर्व संबंधित विभागांच्या प्रतिनिधी समवेत म्हणजेच मत्स्यव्यवसाय विभागाचे स्थानिक परवाना अधिकारी मढ गोराई, सागरी पोलिस, बंदर निरीक्षक व मच्छिमार संस्थाचे प्रतिनिधी यांनी अपघातग्रस्त नौकेची पहाणी करुन अपघातामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला.
(३) व (४) विभागामार्फत नुकसान भरपाई मिळण्याच्या अनुषंगाने मरीन मर्केनटाईल डिपार्टमेंट (MMD) यांना कळविण्यात आले असून संबंधितांना जहाज कंपनीने नुकसान भरपाई म्हणून दिलेली रू.१८.५० लक्षची दर्शनीहुंडी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते नौका मालक यांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वसतिगृहे व आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दरडोई अनुदानात वाढ करण्याबाबत व एड्सग्रस्त व मतिमंद निवासी विद्यार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(१०) १४८० (२५-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वसतिगृहे व आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दरडोई अनुदानात वाढ तर एड्सग्रस्त आणि मतिमंद निवासी विद्यार्थ्यांच्या अनुक्रमे ७०० व ८०० रुपये अनुदानात वाढ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यादरम्यान घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांना अद्याप अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच विद्यार्थ्यांना अनुदान तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२८-०२-२०२६) :** (१) होय खरे आहे.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच दिव्यांग कल्याण या विभागाच्या अधिनस्त स्वयंसेवी संस्था संचलित शासन मान्यता प्राप्त अनुदानित संस्थामधील प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दरडोई परिपोषण अनुदानात शासन निर्णय, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ अन्वये रू.१५००/- वरून रू.२२००/- याप्रमाणे वाढ करण्यात आलेली असून अनुदानित संस्थामधील एडसग्रस्त व मतिमंद निवासी विद्यार्थ्यांच्या परिपोषणात रू.१६५०/- वरून रू. २४५०/- याप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.
(२) व (३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ पासून अनुदान लागू करण्यात आलेले आहे. सदर अनुदानित वसतिगृहातील कर्मचारी मानधन, इमारत भाडे व परिपोषण अनुदानासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एकूण २४८.६४ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये रू. ३९० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली असून शासन ज्ञापन, दिनांक २६ जून, २०२५ अन्वये रू.७८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. सदर तरतूदीमधून सर्व प्रथम कर्मचारी मानधन व तदनंतर परिपोषण अनुदान व इमारत भाडे अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जमातीच्या आश्रमशाळा सुधारुन परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची संख्या वाढविण्याबाबत

**(११) १५८० (२६-०४-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी २९७ आश्रमशाळा असूनही निधीअभावी मुलभूत सोयी-सुविधा देण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परदेशी शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्या केवळ ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत असल्याचे राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष यांच्या माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनुसूचित जमातीच्या आश्रमशाळा सुधारण्यासाठी व परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०३-०३-२०२६) :** (१) नाही.

राज्यात आदिवासी विकास विभागातंर्गत ५०० शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आश्रमशाळांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

(२) परदेशी शिष्यवृत्ती योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत ५७ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

(३) शासकीय आश्रमशाळामध्ये बांधकामाकरिता नविन टाईप प्लॅन नुसार बांधकाम करण्यात येत असून यामध्ये शालेय इमारत, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, बहुउद्देशिय सभागृह, भोजन कक्ष इत्यादीसाठी इमारती बांधण्यात येतात. सद्य:स्थितीत १७९ कामे पूर्ण झाली असून ४४६ कामे प्रगतीपथावर आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येतात.

राज्यातील १२१ आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यात येत आहे. या उपक्रमातंर्गत आश्रमशाळेमध्ये डिजीटल क्लासरुम

ICT लॅब, सायन्स लॅब, ग्रंथालय, मुला/मुलींकरीता स्वतंत्र व सुसज्ज वसतीगृह इमारत, सुसज्ज भोजनालय स्वतंत्र सिकरुम, संरक्षण भिंत, CCTV कैमेरे इत्यादी कामे करण्यात येत आहे.

परदेशी शिष्यवृत्तीचा लक्षांक प्रति वर्षी १० वरुन ४० करण्यात आलेला आहे. परदेशी शिष्यवृत्तीकरिता वेगळे संकेतस्थळ विकसित केलेले आहे. तसेच योजनेस व्यपक प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी या योजनेचे लाभ घेतला आहे ते विद्यार्थी वसतिगृह महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर गट-अ संवर्गातील रिक्त पदावर नियुक्ती केल्याबाबत

**(१२) १८१८ (२६-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जगदिश बहिरा प्रकरणात निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यादरम्यान शासन निर्णय निर्गमित करुन अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर गट-अ संवर्गामधील जातवैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या ०५ उप जिल्हाधिकाऱ्यांना गैरमार्गाने अधिसंख्य पदावर वर्ग केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीचे केवळ एक पद रिक्त दाखवून १० पदे गायब केली असल्याचे शासनाच्य निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी ०१ व तहसिलदार यांची ०५ पदे अनुसूचित जमाती गट-अ ची पदे तसेच अनुसूचित जमातीचा पूर्वीचा २५ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार संबंधित गैरमार्गाने मिळविलेल्या पदाविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

दिनांक २७/०१/२०२० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या उपजिल्हाधिकारी संवर्गाकरिता एकूण ५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आले आहेत.

(२) उपजिल्हाधिकारी संवर्गाकरिता वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने अनुसूचित जमातीकरिता मागणीपत्र २०२१-१ पद, मागणीपत्र २०२२-२ पदे, मागणीपत्र २०२३-२ पदे, मागणीपत्र २०२४-१ पद व मागणीपत्र २०२५-निरंक पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.

(३) अपर जिल्हाधिकारी संवर्गातील पदे ही केवळ पदोन्नतीने भरण्यात येतात.

दिनांक २७/०१/२०२० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या क्षेत्रिय आस्थापनेवरील अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील एकूण १२ अधिकाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आले आहे. त्यामध्ये तहसिलदार संवर्गाकरिता एकूण ५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आले आहेत.

तहसिलदार संवर्गाकरिता वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने अनुसूचित जमातीकरिता रिक्त असलेली ३ पदे विचारात घेऊन एकूण २५ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. सन २०२१, २०२३, २०२४ व २०२५ मध्ये सरळसेवा कोटयामध्ये पद उपलब्ध नसलयाने तहसिलदार संवर्गाचे "निरंक" पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील SLP (Civil) No. १७०४१/२०१६ मध्ये Civil Appeal No.३७०/२०१७ या याचिकेत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०/०८/२०२१ रोजी दिलेले अंतिम आदेश व सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाने दिनांक ०९/११/२०२१ रोजी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन श्री.चंद्रभान हरिचंद्र पराते, अपर जिल्हाधिकारी यांच्या सेवा दिनांक २६/०३/२०२४ च्या शासन

आदेशान्वये समाप्त करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील स.नं.७३८ मधील ०२ हे क्षेत्र लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी संपादित करण्याबाबत**

**(१३) २४४७ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील स.नं. ७३८ मधील ०२ हे. क्षेत्र लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी संपादित करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, न.प.अंबाजोगाई. यांनी त्यांचे पत्र.क्र. ९६०७ दिनांक ०९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त स्मशानभूमीच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०३-२०२६) :** (१), (२) व (३) सदर भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने उपअधिक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांचे मार्फत आयोजीत संयुक्त मोजणीस दिनांक २६.०९.२०२५ रोजी प्रत्यक्ष जागेवर स्थानिक शेतकरी यांनी मोजणीस विरोध केला. तद्नंतर, पोलीस बंदोबस्तात दिनांक १४.११.२०२५ रोजी संयुक्त मोजणी करण्यात आली.
सदर मोजणी विरोधात स्थानिक शेतकरी यांनी दिवाणी दावा क्र. ७०५/२०२५ दाखल केला असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हर्णे बंदर (जि.रत्नागिरी) अनधिकृत तसेच परकीय मासेमारीला प्रतिबंध घालण्यासाठी ड्रोन पुरविण्याबाबत**

**(१४) २४६६ (२८-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याला ७२० किमीचा समुद्रकिनारा लाभलेला असून, एवढ्या मोठ्या समुद्रकिनाऱ्याची गस्त घालणे आणि अनधिकृत तसेच परकीय मासेमारीला प्रतिबंध घालण्यासाठी राज्यातील सात सागरी जिल्ह्यासाठी ९ ड्रोन मिळणार असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिरकरवाडा ते साखरी नाटे (जि.रत्नागिरी) किनाऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी दोन ड्रोन मिळणार असून, यामध्ये हर्णे बंदराकरीता ड्रोन देण्याचा विचार करण्यात आलेला नाही,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन हर्णे बंदरामध्ये तातडीने ड्रोनची व्यवस्था करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१२-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत व परराज्यातील मासेमारीला प्रतिबंध करणेकरिता ड्रोन आधारित देखरेख व डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली अंतर्गत (८+२) वर्ष या कालावधी करिता एकुण ०९ ड्रोनची सेवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन घेण्यात आलेली आहे. ड्रोनद्वारे प्रभावीपणे गस्त घालून परराज्यातील अनधिकृत मासेमारी नौकांवर नियंत्रण मिळविण्याचा मुख्य उद्देश आहे.

(२) व (३) रत्नागिरी जिल्ह्याकरिता ०३ ड्रोन उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत (साखरीनाटे, भाटे व मिरकरवाडा, हर्णे बंदर व लगतचा भाग) या ०३ ड्रोनमार्फत रत्नागिरी जिल्ह्यातील सागरी जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विक्रमगड (जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेतंर्गत वनराई बंधारे बांधण्याबाबत

**(१५) २६२६ (२६-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) येथील ४३ ग्रामपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजनेतंर्गत वनराई बंधारे बांधून पाणीटंचाई दूर करण्याची मागणी तेथील नागरिकांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात पावसाळयात शेतीची कामे असणे, मजुरांना सण संपल्यानंतरही रोजगार न मिळणे, आदिवासी मजूरांचे रोजगारासाठी स्थलांतर होत असणे इ. कामे रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर वनराई बंधारे बांधल्यास या भागांमध्ये पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होऊन काही प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेंतर्गत वनराई बंधारे बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) रोजगार हमी योजनेमध्ये पाण्याच्या पातळीमध्ये वाढ करण्यासाठी / जलसंधारण करण्यासाठी व मजुरांना रोजगार मिळण्यासाठी नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाची (एनआरएम) १८२ कामे घेण्यात येतात. या कामामुळे जलसंधारण होऊन पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होते.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जी वैयक्तिक कामे घेण्यात येतात त्यात वनराई बंधारे कामाचा समावेश नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यात वयोश्री योजनेंतर्गत राज्य शासनाच्या वतीने अनुदान दिले जाणार असल्याबाबत

**(१६) २८२९ (३०-०४-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात वयोश्री योजनेंतर्गत राज्य शासनाच्यावतीने ६५ वर्षांवरील ज्येष्ठाना एक रक्कमी ३००० रुपयांचे अनुदान दिले जाणार असल्याने त्याअंतर्गत जिल्ह्यात ३७ हजार २७४ अर्ज सामाजिक न्याय विशेष

सहाय्य विभागाला प्राप्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अर्जापैकी ५००० अर्ज मंजूर केले असून अद्याप ३२ हजार २७४ ज्येष्ठ लाभार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याने ते या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अहमदनगर जिल्ह्यातून सुमारे एक लाख ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत अर्ज केलेले असून अद्यापपर्यंत ७५ हजार ज्येष्ठ नागरिकांना या योजनेअंतर्गत पैसे मिळाले नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात वयोश्री योजनेंतर्गत दाखल केलेले सर्व अर्ज मंजूर करून त्यांना तातडीने अनुदान देऊन नवीन अर्ज स्वीकारणे बंद केले ते सुरू करण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सोलापूर व अहिल्यानगर जिल्हयातील वयोश्री योजनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

सोलापूर जिल्हयात वयोश्री योजनेतंर्गत ३७,२७४ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी २७३५० लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झाले असून त्यापैकी २०,६४० लाभार्थ्यांना थेट लाभ वितरण प्रणालीव्दारे लाभ देण्यात आलेला आहे. उर्वीरत लाभार्थ्यांना निधी उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) व (४) अहिल्यानगर जिल्हयात वयोश्री योजनेतंर्गत ८८,६१७ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी आधार प्रमाणिकरण पूर्ण झालेल्या ४९,९४८ लाभार्थ्यांना थेट लाभ वितरण प्रणालीव्दारे लाभ देण्यात आलेला आहे.उर्वरित लाभार्थ्यांना निधी उपलब्धते नुसार अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहाचा दर्जा सुधारुन प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत

**(१७) २८३९ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहाचा दर्जा सुधारुन त्यांच्या प्रवेश प्रक्रियेच्या क्षमतेत वाढ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मौजे औसा (ता. औसा जि. लातुर) या ठिकाणी सद्यस्थितीत ७५ विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे एक व ८० विद्यार्थी क्षमतेचे मुलीचे एक असे दोन स्वतंत्र वसतिगृह कार्यरत आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे

शासकीय वसतिगृह मौजे औसा (ता. औसा जि.लातुर) या वसतिगृहाची मान्य विद्यार्थी संख्या ७५ वरुन १०० इतकी वाढविण्यात आली आहे, तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह मौजे औसा (ता. औसा जि.लातुर) या वसतिगृहाची मान्य विद्यार्थी संख्या ८० वरुन १०० इतकी वाढविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उधवा (ता.तलासरी, जि.पालघर) येथीलआश्रमशाळेला**
**संरक्षण भिंत नसल्याबाबत**

**(१८) ३३५२ (२७-०४-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उधवा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील आश्रमशाळेला संरक्षण भिंत नसल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेला संरक्षण भिंत उभारण्याचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित असून तातडीने निकाली काढण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (१३-०३-२०२६) :** (१) व (२) उधवा (ता.तलासरी, जि. पालघर) येथील आश्रमशाळेला असणारी संरक्षक भिंत / तारेचे कुंपण मोडकळीस आलेले आहे. उधवा आश्रमशाळेतील संरक्षक भिंतीचे काम DA-JGUA अंतर्गत करण्याचे प्रस्तावित होते. मात्र सदर कामास मंजूरी मिळाली नाही. आता पुढील आर्थिक वर्षात निधीची उपलब्धता व कामाचा प्राधान्यक्रम निश्चित करुन त्यानुसार हे काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बार्टी, सारथी व महाज्योतीची स्वायत्तता अबाधित राखण्याबाबत**

**(१९) ३६२९ (२५-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बार्टी, सारथी, महाज्योती व आदीवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टिआरटिआय) या संस्थेमार्फत पुणे येथे यूपीएससी व एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात येत असून या प्रशिक्षणासाठी विदर्भातील ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा असोसिएशन व स्पर्धा परीक्षा समन्वय समितीसारख्या नोंदणी नसलेल्या विद्यार्थी संघटनेकडून मानसिक व आर्थिक त्रास देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे येथे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून विद्यावेतन देण्यात येत असून ते वेतन सदर विद्यार्थी संघटनेकडून धमकावून व सक्तीने त्यांच्याकडून वसूल करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई तसेच ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षेच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाज्योतीच्या विविध स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संघटनेद्वारे त्रास देण्यात येत असल्याची तक्रार महाज्योती कार्यालयास प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

प्रशिक्षणार्थींना दर महिन्याचे विद्यावेतन हे त्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे अदा करण्यात येते.

(३) महाज्योतीच्या विविध स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संघटनेद्वारे त्रास देण्यात येत असल्याची तक्रार महाज्योती कार्यालयास प्राप्त होताच तक्रारीची चौकशी करण्याकरिता महाज्योती कार्यालयात तक्रार समिती गठीत केलेली आहे व सदर तक्रारीची चौकशी करणे सुरू आहे. तसेच, महाज्योती संस्थेसोबत कार्यरत असलेल्या सर्व प्रशिक्षण संस्थांना देखील प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांच्या उपाययोजनेकरिता प्रत्येक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांकरिता तक्रार निवारण कक्ष गठीत करण्याकरिता व तक्रार पेटी उपलब्ध करुन देण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून प्रशिक्षण संस्थेस सुरक्षा रक्षक म्हणून नेमण्याकरिता पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शासकीय आश्रमशाळेतील मुलींच्या सुरक्षा व सुविधांच्या कमतरतेबाबत

**(२०) ४०१० (२७-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व जिल्ह्यातील ५०० शासकीय आश्रमशाळेची सर्व्हेक्षण करुन टाटा समाज विज्ञान संस्थेने (टीस) सादर केलेल्या अहवालात मुलींच्या सुरक्षेत अनेक त्रुटी आणि सुविधांची कमतरता असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळा टाटा संस्थेने सन २०१९ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालाच्या निष्कर्षातील त्रुटी दूर करण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने टाटा संस्थेने सादर केलेल्या अहवालातील त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (१३-०३-२०२६) :** (१) होय.

टाटा समाज विज्ञान संस्थेने (TISS) राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांचे सर्व्हेक्षण करून ऑगस्ट, २०१५ मध्ये अहवाल सादर केला आहे. त्यानुसार काही आश्रमशाळामध्ये त्रुटी आढळून आल्या.

(२) व (३) टाटा विज्ञान संस्थेच्या (TISS) अहवालामध्ये नमुद केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी भरती प्रक्रिया, पायाभूत सुविधा सुधारणा, शैक्षणिक साहित्य उपलब्धता, प्रकाश व्यवस्था, आरोग्य व्यवस्था (नर्स, सिक रुम, प्राथमिक वैद्यकीय उपकरणे) स्वच्छता व्यवस्थापन व सुरक्षा व्यवस्था (CCTV कॅमेरे, पहारेकरी) अशा विविध उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वांद्रे पूर्व येथील रेल्वेकडे अतिरिक्त गेलेली जमीनीची मोजणीकरण्याबाबत

**(२१) ४०५० (२८-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (ता.अंधेरी) येथील न.भू.क्र. ६७६, ६७७ व ६७८ या मिळकतीमधून रेल्वेकडे अतिरिक्त गेलेले अंदाजे ६७ एकर क्षेत्र कमी करून राज्य शासनाच्या नावे करण्याबाबत शासनाकडे स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुर्नमोजणी करून रेल्वेकडे अतिरिक्त गेलेली जमीन मोजणीची कार्यवाही करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वांद्रे (ता. अंधेरी) येथील न.भू.क्र. ६७६, ६७७ व ६७८ येथील मिळकतीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ११/११/२०१३ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २०(२) अंतर्गत आदेश पारीत केले आहेत. या आदेशानुसार सदर मिळकती पश्चिम रेल्वेच्या मालकीच्या ठरविण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या आदेशाविरुध्द अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल झाले होते. सदर अपिलामध्ये अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ३०/१०/२०१५ रोजी फेरचौकशी करून सुधारित आदेश पारीत करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २०(२) अंतर्गत दिनांक २७/०१/२०१९ रोजी आदेश पारीत केले असून सदर जमिनी पश्चिम रेल्वेच्या मालकीच्या ठरविण्यात आल्या असून धारक सदरी पश्चिम रेल्वेची नोंद घेण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक २७/०१/२०१९ रोजीचे आदेश अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ०७/१०/२०१९ रोजीच्या आदेशान्वये कायम केले आहेत. अर्जदार यांनी अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक ०७/१०/२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केला होता. सदर अपिल अर्ज मा.मंत्री (महसूल) यांच्या निर्देशानुसार सुनावणी घेऊन निर्णय पारीत करण्यासाठी अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.), महसूल व वन विभाग यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. सदर अपिल अर्ज प्रकरणी अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.) यांनी दिनांक २१/०४/२०२५ रोजी आदेश पारीत केलेले असून सदर आदेशानुसार अर्जदार यांचा अर्ज विधीग्राहय नसल्याने विनाकार्यवाही निकाली काढला आहे. सदर आदेशात अर्जदारास महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम २५७ प्रमाणे पुनरिक्षण अर्ज दाखल करण्यास मुभा देणेत येत आहे, असे नमूद केलेले आहे. त्यानुसार संबंधितांना पुनरिक्षण अर्ज दाखल करण्याची मुभा आहे. सदर प्रकरण हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असून या प्रकरणी अर्धन्यायिक स्वरुपात निर्णय होणे आवश्यक आहे. या प्रकरणी प्रशासकीय स्वरुपात निर्णय घेता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे कसबे तडवळे (जि. धाराशिव) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय, क्रांतीस्तंभ व इतर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(२२) ४६०५ (२५-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कसबे तडवळे (जि. धाराशिव) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय, क्रांतीस्तंभ व इतर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर प्रकल्पासाठी आयुक्तालयाकडून निधीचे वितरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रशासकीय कामासाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने स्मारकाचे काम प्रलंबित असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अन्य ठिकाणी बांधुन दिल्याशिवाय सदर स्मारकाचे काम होणार नाही असे जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जागेचा मोबदला म्हणून एक १,९७,६४,३६०.०० रुपये व इमारत बांधकामासाठी १०८६.१० लक्ष रुपये असे एकूण १२८३.७४ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाला मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक ९.१०.२०१५ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वी जयंती वर्षे दिनांक १४ एप्रिल, २०१५ ते दिनांक १४ एप्रिल. २०१६ हे वर्ष "समता व सामाजिक न्याय" वर्ष म्हणून साजरे करण्यास व त्या अनुषंगाने या वर्षामध्ये कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यास मान्यता प्रदान केली आहे.

यानुषंगाने विभागाच्या दिनांक २४.०३.२०१७ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-अ अ.क्र.१७ नुसार मौजे कसबे तडवळे, जि. उस्मानाबाद येथील सार्वजनिक वाचनालय, क्रांतीस्तंभ व इतर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर प्रकल्पासाठी रू. १ कोटी/- इतका निधी वितरण करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत मौजे कसबे तडवळे, जि. उस्मानाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय व क्रांतीस्तंभ बांधण्याकरिता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या आवारात जागा उपलब्ध नसल्याने पर्यायी व्यवस्था करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर येथै सोयाबीन संशोधन केंद्र मंजूर करण्याबाबत

**(२३) ४८०४ (२५-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोयाबीन उत्पादनात लातूर हा पहिल्या नंबरचा जिल्हा असून संशोधन केंद्र मंजूर करुन कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री (लातूर) महोदयांकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सोयाबीन संशोधन केंद्र उभारणीकरिता निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे धर्मापुरी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड येथे सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

या सोयाबीन संशोधन केंद्राचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण मराठवाडयासाठी असून, या केंद्राचा फायदा लातूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना देखील होणार आहे. त्यामुळे, लातूर जिल्ह्यासाठी नव्याने स्वतंत्र सोयाबीन संशोधन केंद्र स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हवेली व मुळशी (जि. पुणे) तालुक्यातील तलाठी, मंडल अधिकारी आणि पुणे शहर, पिंपरी चिंचवड येथील नगर भूमापन अधिकारी ऑनलाईन फेरफार परस्पर रद्द करीत असल्याबाबत

**(२४) ५०८१ (२९-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली व मुळशी (जि. पुणे) तालुक्यातील तलाठी, मंडलअधिकारी आणि पुणे शहर व पिंपरी चिंचवड येथील नगर भूमापन अधिकारी ऑनलाईन फेरफार परस्पर रद्द करत असून जमीनधारकांना लेखी अर्ज करण्यास सक्ती केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दस्त नोंदणी झाल्यावर दस्ताच्या नोंदीबाबत ऑनलाईन फेरफार विहित वेळेत नोंद न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, दस्ताच्या हक्क नोंदीसाठी मिळकत आणि जमीन मालकांना तलाठी कार्यालयात फेऱ्या मारायला लावण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ऑनलाईन फेरफार नोंदणी विहित वेळेत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२५ ते १२ मार्च, २०२५ अखेर मुळशी, हवेली, अपर तहसिल पिंपरी-चिंचवड व अपर तहसिल लोणी काळभोर या तालुक्यामध्ये ऑनलाईन एकूण ९०१९ नोंदी प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्राप्त ऑनलाईन नोंदीपैकी एकूण ७३६५ नोंदी मंजूर व ५२३ नोंदी नामंजूर करणेत आलेल्या आहेत व उर्वरीत ११३१ नोंदी या विहित मुदतीवर निर्गत करणेचे स्तरावर आहेत, तसेच नामंजूर करणेत आलेल्या ५२३ नोंदी या भाडेपट्टा, शेतकरी पुरावा नसलेने, फेरफार मध्ये क्षेत्र नमूद नाही, एकापेक्षा जास्त व्यवहार असा Error येत असलेमुळे, खातेदारांचे क्षेत्र दिसत नसल्यामुळे, फेरफाराचे पुर्वावलोकन दुरुस्त होत नसल्याने, दुय्यम निबंधक यांचेकडून चुकीची डाटा एंट्री नोंदविलेने, दुबार नोंदी झाल्याने, अंमल चुकीचा, कुलमुखत्यार च्या नावाच्या नोंदी, इत्यादी सर्वसाधारण कारणामुळे ऑनलाईन फेरफार मंडल अधिकारी यांचेकडून रद्द करणेत आलेले आहेत.
मुद्दा क्र. (२) व (३) बाबत, अशी बाब नाही.

सन २०२१ पासून सर्व दस्तांचे फेरफार हे दुय्यम निबंधक यांचेकडून ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होत असलेने व त्यापुढील सर्व प्रक्रीया शासनाने घालुन दिलेल्या मानकांनुसार ऑनलाईन पध्दतीने राबविणेत येत असलेने तसेच ऑनलाईन फेरफाराबाबत FIFO प्रणाली लागु असुन त्यानुसार प्रथम प्राप्त होणाऱ्या फेरफारावर प्रथम निर्णय घेतल्यानंतरच पुढील निर्णय घेता येतो.
(४) अशी बाब नाही.

ऑनलाईन फेरफार नोंदी विहीत कालावधीमध्ये निर्गत करणेच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन वरीष्ठ कार्यालयाकडुन व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो. तसेच फेरफार नोंदी घेतेवेळी किंवा नोंदीवर निर्णय घेतेवेळी येणाऱ्या तांत्रिक अडचणीबाबतही वेळोवेळी जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेऊन अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

(५) प्रश्नच उद्धवत नाही.

---

## राज्यात रोजगार हमी योजनेतंर्गत एक लाखांपेक्षा अधिक विहीरींना मंजुरी दिली असूनही कामे अपूर्ण असल्याबाबत

**(२५) ५६३१ (२५-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेतील सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये संतुलन न ठेवता ४५% निधी हा केवळ विहीर खोदण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षांमध्ये एक लाखांपेक्षा अधिक विहीरींना मंजुरी दिली आहे तसेच मोठ्या प्रमाणात विहीरींना मंजुरी देताना कोणते निकष लावले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विहीरींची कामे पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. भरत गोगावले (३०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

सदर योजना ही मागणी प्रवण योजना असल्याने शेतकऱ्यांना मागणीनुसार विहिरी देण्यात येतात.

(३) सदर योजनेंतर्गत मागील दोन वर्षामध्ये अपूर्ण विहिरींची कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावरील यंत्रणेमार्फत वारंवार बैठका घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच विहिरी पुर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कुशल निधीची मागणी व पाठपुरावा केंद्र शासनाकडे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(२६) ६१०४ (२८-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाने वित्त विभागाच्या नियमांना बगल देत खाजगी बँकेत १० कोटीच्या ठेवी ठेवल्या असून, नियमबाह्य बदल्या व जप्त मोटारीचा कार्यालयीन कामांसाठी वापर आणि वाहन दुरुस्तीसाठी लाखोंची उधळपट्टी केली जात असणे व बोगस बिले देऊन अपहार केला जात असणे इ.बाबत लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्यायमंत्री तसेच मा.सचिव,सामाजिक न्याय,मा.समाजकल्याण आयुक्त यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२३ तसेच दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडील विविध खात्यावरील मिळालेली व्याजाची रक्कम रु. १०.८८ कोटी दिनांक २८/०३/२०२४ रोजी AU Small बँकेच्या बचत खात्यामध्ये गुंतवणुक करण्यात आली होती. त्यामध्ये फेब्रुवारी २०२५ अखेर रु. ७३,०३,७८७/- इतकी व्याजाची रक्कम या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई, दिनांक २५/०५/२००६ च्या अधिसुचनेतील प्रकरण २ अनुक्रमांक ३(१) अन्वये जे अधिकारी/कर्मचारी बऱ्याच वर्षापासुन (१२ ते १५ वर्ष) एकाच पदावर व एकाच कार्यालयात कार्यरत होते अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदली आदेश निर्गमित केलेले आहेत.

जप्त मोटारींच्या बाबतीत मा. न्यायालयाचे आदेशान्वये महामंडळामार्फत उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे नाळवंडी व काळेगाव हवेली (ता.जि.बीड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामातील निकृष्ट दर्जा व अनियमिततेबाबत

**(२७) ७०७६ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नाळवंडी व काळेगाव हवेली (ता.जि.बीड) येथे नरेगा विभागातील अधिकाऱ्यांसमवेत दिनांक १४ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये नरेगा अंतर्गत पाणंद रस्ता खडीकरण व मजबुतीकरणाची रितसर पाहणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाहणी करताना रस्त्यांच्या दर्जाबाबत ग्रामस्थांच्यावतीने जी तक्रार होती ती तंतोतंत खरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजपत्रकाप्रमाणे कोणत्याही रस्त्यांचे काम सदर ठिकाणी झाले नसल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसत होते व श्री. रावसाहेब वाघमारे यांचे शेत ते गवळी यांच्या शेतापर्यंत खडीकरण व इतर १६ रस्ते या नरेगा अंतर्गत सर्व रस्त्यांच्याबाबतीत जो निकृष्ट दर्जा व अनियमितता झाल्याबाबत उच्चस्तरिय चौकशीची व संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाहीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामातील निकृष्ट दर्जा व अनियमिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.
(४) आयुक्त (नरेगा), नागपुर यांच्या निर्देशानुसार सहआयुक्त (रोहयो), छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावरुन नेमणुक केलेल्या चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार संबंधीतांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, बीड यांना आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपुर यांनी दिनांक ०५/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्याचे उपअधीक्षक यांनी मोजणी नकाशात फेरबदल करून प्रत्यक्ष जागेवर मोजणी न करता मोजणी कार्यालयात बसून जागेची प्रत दिल्याबाबत**

**(२८) ७७१३ (१९-०८-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्याचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील यांनी मोजणी नकाशात फेरबदल करून प्रत्यक्ष जागेवर मोजणी न करता मोजणी कार्यालयात बसून जागेची प्रत दिल्याबाबत येरवडा पोलिस ठाण्यात माहे मे, २०२५ मध्ये एक गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हवेली मोजणी कार्यालयात यापूर्वीही मोजणीच्या नकाशात फेरबदल करून, बनावटीकरण झाल्याच्या असंख्य तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांनी करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यातयेत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०३-२०२६) :** (१) तत्कालीन उप अधीक्षक भूमि अभिलेख, हवेली व अन्य १ यांचे विरुध्द येरवडा पोलीस ठाणे येथे दिनांक १०.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.३२३/२०२५ असा गुन्हा दाखल झालेला आहे.
(२) व (३) उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली यांच्या कामकाजाची तपासणी / चौकशी करण्यासाठी जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १३.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीने दिनांक १३.०५.२०२५ व १९.०५.२०२५ च्या पत्रांव्दारे शासनास सादर केलेल्या अहवालानुसार श्री. अमरसिंह पाटील, तत्कालीन उप अधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**कोकणातील देवराई/देवराहाटी व देवस्थानांच्या जमिनीच्या सात-बारा उताऱ्यांमधील नोंदी पूर्ववत करण्याबाबत**

**(२९) ७७७७ (१९-०८-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१८ नंतर महसूल विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता व कायदेशीर प्रक्रिया न करता देवराई व देवस्थानांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्यातील नोंदी रद्द करून त्या जमिनी शासनाच्या नावावर केल्या आहेत, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थापन अधिनियम, १९५० च्या तरतुदींना विरोध करुन तसेच धार्मिक व सांस्कृतिक हक्कांचे उल्लंघन करणारी असून संबंधित सर्व ७/१२ उताऱ्यातील नोंदी तात्काळ पूर्ववत करण्याची मागणी संबंधित मंदिर विश्वस्तांकडून, लोकप्रतिनिधीकडून मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील देवराई/देवराहाटी हा प्राचिन काळापासून ग्रामस्थांच्या श्रद्धेचा भाग असून, त्यांचा वापर धार्मिक विधी, परंपरा आणि पर्यावरणीय संतुलनासाठी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित सर्व ७/१२ उताऱ्यातील नोंदी पूर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) रत्नागिरी जिल्ह्यातील देवराई/देवरहाटी/राई या सर्व मिळकतीच्या अधिकार अभिलेखातील नोंदीसंदर्भात मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे निवेदन प्राप्त झाले होते. त्यानुसार पडताळणी केली असता, रत्नागिरी जिल्ह्यातील देवराई/देवरहाटी/राई या अधिकार अभिलेखापूर्वीपासूनच महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या आहेत. अशा नोंदी संबंधित गाव अभिलेख ७/१२, गाव नमूना नं.१ब, फेर फार तसेच आकारबंदाला आहेत. या सरकारी मिळकतीच्या ७/१२ अभिलेखामध्ये भोगवटादार/कब्जेदार सदरी "महाराष्ट्र शासन" अशी नोंद करून या जमिनीचा वापर ज्या प्रयोजनासाठी होत आहे म्हणजेच, या जमिनीचा वापर "देवराई/देवरहाटी/राई" साठी होत असल्याने तसा तपशिल इतर हक्कात नमूद करण्यात आलेला आहे. त्याची भू-धारणा पध्दती सरकार आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थापन अधिनियम, १९५० च्या तरतुदींना विरोध करुन तसेच धार्मिक व सांस्कृतिक हक्कांचे उल्लंघन केल्याची बाब दिसून आली नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१० व शासन परिपत्रक दिनांक ०६.११.२०१८ अन्वये देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आल्यास अशी प्रकरणे पुनरिक्षणात घेवून तातडीने निकाली काढण्याच्या सूचना सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व विभागात देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरणाचा शोध घेऊन सदर जमिनी पुन:श्च देवस्थानाच्या नावे करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील पिडीत दलित-आदिवासी कुटूंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्याबाबत

**(३०) ७८३८ (१९-०८-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील खून व हत्या अशा गंभीर प्रकरणातील पिडीत दलित व आदिवासी कुटुंबातील १५ व्यक्तींनी शासकीय नोकरीची मागणी केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) या विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत दाखल खून किवा अत्याचाराच्या अनुषंगाने झालेल्या मृत्युच्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसदारास शैक्षणिक अर्हता व पात्रतेप्रमाणे शासकीय/निमशासकीय नोकरी देण्याची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

तसेच सदर शासन निर्णयानुसार जुलै, २०२५ पर्यंत प्रलंबित असलेल्या ८८९ प्रकरणांत एक वेळची विशेष बाब म्हणून केवळ गट-"ड" संवर्गातील पदावर नियमित नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयानुसार आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना नियुक्तीस मंजुरी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणांत समाजकल्याण आयुक्तालय स्तरावर नोकरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात बार्टी, सारथी, टार्टी, महाज्योती व अमृत इ. साठी मागासवर्गीय संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३१) ७९४० (२०-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने विविध सामाजिक घटकांतील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी, टार्टी, महाज्योती व अमृत (खुल्या प्रवर्गांसाठी) शैक्षणिक प्रगती होण्यासाठी वेगवेगळी मंडळे निर्माण केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बार्टी खेरीज अन्य मंडळाची जिल्हावार मागासवर्गीय संशोधन केंद्र अद्याप निर्माण करण्यात आले नसल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेगवेगळी मंडळे निर्माण करुन त्यांची जिल्हावार संशोधन केंद्रे नसल्याने त्याबाबत पालक व विद्यार्थ्यांकडून स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालक व विद्यार्थ्यांकडून होत असलेली मागणी लक्षात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हावार मागासवर्गीय संशोधन केंद्रे स्थापन करण्याबाबत तसेच शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

महाज्योती संस्थेमार्फत राज्यात प्रत्येक जिल्ह्यात संशोधन केंद्र स्थापन न करता नाशिक, छ. संभाजी नगर,

अमरावती, पुणे, कोल्हापूर या ठिकाणी प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्यात आले असुन इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील सहाय्यक संचालक, इ.मा.ब.क यांची महाज्योतीचे नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाज्योती संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेले प्रादेशिक कार्यालय तसेच नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले सहाय्यक संचालक यांच्या मार्फत विविध योजनांचे कामकाज प्रत्येक जिल्ह्यात सुरू असून लाभार्थी घटकातील पालक व विद्यार्थी यांच्या वतीने प्राप्त लेखी निवेदन व अडचणी मुख्य कार्यालयात पाठविण्यात येऊन त्यांचे निराकरण करण्यात येते.

सारथी, पुणे या संस्थेमार्फत विभागीय स्तरावर कोल्हापूर, नागपूर इ. ठिकाणी उपकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील आक्सापूर-महाराष्ट्र-तेलंगणा राज्याच्या सीमेवर पोडसा येथे वनविभाच्या तपासी नाक्याची चौकशी करण्याबाबत

**(३२) ८०७९ (०८-०९-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील आक्सापूर-महाराष्ट्र-तेलंगणा राज्याच्या सीमेवर पोडसा येथे वनविभागाच्या तपासी नाक्याची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी मा.वने मंत्री महोदयांना दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१३-०३-२०२६) :** (१) व (२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर, यांनी कळविल्यानुसार मा. आमदार, राजुरा विधानसभा महोदयांनी दिनांक १७.०२.२०२५ ला पंचायत समिती गोंडपिपरी येथे घेतलेल्या आढावा सभेत पोडसा येथे वनविभागाने बांधलेल्या नाक्याची इमारत ताब्यात घेणे बाबत सुचना वनपरिक्षेत्र अधिकारी, धाबा यांना प्राप्त झालेल्या आहेत.

आढावा सभेत प्राप्त निर्देशानुसार इमारती ताब्यात घेण्यासाठी सौ. माधुरी देवीदास सातपुते व श्री. देविदास पांडुरंग सातपुते दोघेही राह. मु.पो. पोडसा ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपुर यांना दिनांक ०१.०३.२०२५ अन्वये कायदेशीर नोटिस बजावण्यात आलेली आहे. या नोटीसवर संबंधितानी उत्तर दिले असुन त्यामध्ये त्यांनी वनविभागाचे सर्व दावे नाकारले असून अमान्य केलेले आहेत. सदर प्रकरण न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आंतरजातीय विवाह योजना शासनाने बंद केल्याबाबत

**(३३) ८४३४ (१९-०८-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने सन २०१४-१५ पासून आंतरजातीय विवाहाबाबतची सुरु असलेली योजना कोणतेही कारण न देता बंद करण्यात आली असून त्याबाबत सामाजिक न्याय विभागाकडून या योजनेसाठी अर्ज करणाऱ्यांना योजना बंद झाल्याचे पत्रच दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या संकेतस्थळावर आजही योजना सुरू असल्याचे दाखविले असतांनाही पात्र अर्जदारांना समाज कल्याण विभागाकडून पत्र पाठवूनही योजना तसेच सामाजिक न्याय आयुक्तालयानेही सर्व जिल्ह्यांच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांना ही योजना बंद झाल्याचे कळविण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, योजनेचा लाभ देणे बंद केले असल्यामुळे ज्यांनी यापूर्वी अर्ज केला आहे व ज्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही, अशा लाभार्थ्यांना लाभ नाकारणे संयुक्तिक नाही असे शासनाने केंद्र शासनास कळिवले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या डॉ. आंबेडकर फाउंडेशन, नवी दिल्ली यांच्या दिनांक १३.०१.२०२३ पत्रान्वये आंतरजातीय विवाह योजनेंतर्गत रु.२.५० लाख अर्थसहाय्याच्या योजनेचे प्रस्ताव दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत स्विकारले जातील व त्यानंतर कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत असे कळविण्यात आलेले आहे.

केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अर्ज स्विकारले जाणार नसलेबाबत नमूद केले आहे.

तसेच डॉ. आंबेडकर फाउंडेशन, नवी दिल्ली यांचे दिनांक १३.१.२०२३ च्या पत्रानुसार आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या दिनांक ६.१२.२०२३ च्या पत्रान्वये सदर योजनंअंतर्गत यापुढे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत असे सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.

मात्र, शासनाचे पत्र दिनांक २.४.२०२५ अन्वये ज्या लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या आंतरजातीय विवाह योजनेअंतर्गत रु.२.५० लाख अनुदानाचा लाभ मिळालेला नाही अशा पात्र लाभार्थ्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी खात्री करुन त्यांना राज्य शासनाच्या दिनांक १.०२.२०१० च्या शासन निर्णयान्वये विहीत आंतरजातीय विवाह योजनेचा लाभ देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार समाजकल्याण आयुक्तालयाचे पत्र दिनांक १७.४.२०२५ अन्वये सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या कार्यालयाच्या जिल्ह्यातील आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ९७९५ (०८-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या कार्यालयाच्या मनमानी कारभारामुळे जिल्ह्यातील आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये वेतन अद्यापही प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना महिन्याच्या एक तारखेला नियमित वेतन देण्यात यावे असे शासकीय आदेश असतानाही अनेक महिन्यांपासून त्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याचे नदिर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर न देणाऱ्या

प्रकल्प कार्यालयातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) अनुदानित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक वेतन देयके प्रकल्प कार्यालयास सादर करतात. प्रकल्प कार्यालय सदर देयकाची तपासणी करुन व निधीच्या उपलब्धता विचारात घेवून देयके कोषागारात सादर केली जातात. मार्च अखेरीस आर्थिक वर्ष संपत असल्याने निधीच्या उपलब्धतेनंतर माहे मार्च व एप्रिल, २०२५ ची वेतन देयके मे, २०२५ मध्ये पारित झाली ही वस्तूस्थिती आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली व सोलापूर जिल्हयातील देवस्थानच्या जमिनी इनाम वर्ग-३ खालसा करण्याबाबत

**(३५) १०१९७ (१९-०८-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलहोळ (ता.खानापूर, जि.सांगली) येथील शेतकरी देवस्थानच्या जमिनी इनाम वर्ग-३ खालसा न केल्याने त्या अद्यापही शेतकऱ्यांच्या नावे झाल्या नसल्याने संबंधित शेतकऱ्यांना पीक कर्ज, शासनाच्या शेतीविषयक सुविधांचा लाभ घेता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे सरफडोह (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील शेत जमिनीवर तहसिलदार, करमाळा यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी चुकीचा शेरा वा आदेश देऊन सर्व शेतजमिनी वर्ग-३ केल्यामुळे सदर गाव विकासापासून वंचित रहात असून गावातील मयत व्यक्तींच्या वारसा नोंदी होत नसून सदर शेरा कमी करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २९ मे,२०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावातील शेतकऱ्यांना पीककर्जासह शेतीवर मिळणाऱ्या विविध सरकारी योजना आणि अनुदाने मिळत नसून पिकांचे नुकसान झाले तर त्या नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, देवस्थानच्या जमिनीवरील इनाम वर्ग-३ खालसा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

देवस्थान इनाम अद्याप खालसा केलेले नसल्याने चिखलहोळ ता. खानापूर जि. सांगली येथील देवस्थान जमिनींच्या ७/१२ अभिलेखात भोगवटादार सदरी देवस्थानाच्या नावासह भोगवटादार सदरी इतर व्यक्तींची नावे घेण्यात आली आहेत. त्यामुळे सदर जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यास अडचणी येत असल्याची बाब दिसून आली आहे.
(२) करमाळा जि. सोलापूर चे लँड ॲलिनेशन रजिस्टर मधील अनुक्रमांक ३९५ येथील नोंदीनुसार मौजे सरफडोह येथील स.नं.(सध्याचा गट नंबर ७९) क्षेत्र १८.१६ एकर गुंठे एवढीच जमीन इनाम वर्ग-६ असून उर्वरित क्षेत्र इनाम वर्ग-३ देवस्थान दिसून येते. सदर इनाम वर्ग-३ अद्याप खालसा झाले नसल्याने सदर जमिनीच्या हस्तांतरणावर निर्बंध आहेत. तथापि, सरफडोह येथील पुरग्रस्त बाधित खातेदारांना अनुदान वाटप केल्याचे दिसून येत आहे.
(३) होय, हे खरे आहे.

देवस्थान इनाम वर्ग-३ असलेल्या जमिनीच्या ७/१२ सदरी देवस्थानच्या नावाच्या नोंदी घेण्यात आल्या असल्याने सदर जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरिता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर अहवाल अंतिम झाल्यावर याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) तालुक्यात नकाशावरील शेतरस्ते वाहतुकीस खुले करण्याबाबत**

**(३६) १०५४६ (२१-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यात अनेक शेत पाणंद रस्त्यांचे मातीकाम व खडीकरण मजबुतीकरणाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत तसेच नकाशावरील सर्व शेत व पाणंद रस्ते दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत वाहतूकीस खुले त्याठिकाणी निधीअंतर्गत मातीकाम व दबई काम मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करुन स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी (लातूर) यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये तहसील कार्यालय येथे विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच प्रलंबित असलेले शेत व पाणंद रस्ते व लांबी किती असून सदरील रस्ते तातडीने खुली करण्याकरिता रस्त्यांचे खडीकरण व मजबुतीकरण करण्याबाबत शासनास किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) औसा तालुक्यात शेत/पाणंद रस्त्यांच्या एकूण ६९९ कामांना मंजूरी असून त्यांची एकत्रित लांबी सुमारे ८९० कि.मी आहे. मंजुरी प्राप्त कामांपैकी एकूण ६१८ कामे सूरू असून त्यांची एकत्रित लांबी सुमारे ७७० कि.मी. आहे. तसेच ८६ कामे पूर्ण झाली असुन पूर्ण कामांची लांबी सुमारे १२८ कि.मी. इतकी आहे. सदर ८६ रस्ते खुले करण्यात आले आहेत. तसेच, सुरू असलेली उर्वरीत कामे मजुरांच्या कामाच्या मागणीनुसार पूर्ण करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्याकडून सन २०२१ मध्ये जाहिर करण्यात आलेल्या विशेष अनुदान योजनेबाबत**

**(३७) १०८०३ (१९-०८-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्याकडून दहावीत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२१ मध्ये विशेष अनुदान योजना जाहीर केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये ९० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना दोन लाख रुपये देण्यात येणार होते आणि यासाठी बार्टीने अर्जही स्वीकारले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२१ मध्ये ही योजना जाहीर केली होती, परंतु या योजनेची अंमलबजावणी झाली नसल्याने उक्त योजना सुरू नसल्याचे बार्टीतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्यातील टीआरटीआय,पुणे, बार्टी, पुणे, सारथी, पुणे, महाज्योती, नागपूर व अमृत, मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच, भविष्यात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दिनांक ०७.०६.२०२४ रोजीच्या बैठकीत समितीने सदर योजनेस असहमती दर्शविल्याने सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील कामाना मंजुरी देण्याबाबत

**(३८) १०८४९ (२०-०७-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील मंजूर झालेल्या कामात अंशत: बदल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास अद्यापही अंतिम मंजूरी देण्यात आली नाही, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (१२-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मा. लोकप्रतिनिधी यांच्या मागणीच्या अनुषंगाने शासन शुद्धीपत्रकान्वये कामात बदल करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याच्या व्याजामध्ये कपात केली असल्याबाबत**

**(३९) १०९५९ (२०-०७-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पायाभूत सुविधासाठी किंवा मोठ्या प्रकल्पांसाठी सरकारकडून शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जात असून या जमिनीच्या मोबदल्यास विलंब झाल्यास नऊ आणि पंधरा टक्के व्याज देण्याची तरतूद असताना प्रकल्पाच्या मूळ खर्चात होणारी वाढ लक्षात घेऊन शासनाने भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिला गेल्यास त्या रकमेवरील व्याज एकाच दराने देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्याजदर बँकेच्या व्याजदरापेक्षा एक टक्क्यांनी अधिक असल्यामुळे तो शेतकऱ्यांना आर्थिक परिणाम करणारा असून सदर निर्णय शेतकऱ्यांचा नुकसान करणारा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०२६) :** (१), (२) व (३) राज्यामध्ये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी जमिनीचे भूसंपादन करण्यात येते. त्यानुसार कलम-२६ ते ३० मधील तरतूदी विचारात घेऊन व नुकसान भरपाईची रक्कम निर्धारीत करण्याबाबतची कार्यवाही भूसंपादन अधिकारी यांच्याकडून करण्यात येते.

सदर अधिनियमाच्या कलम ८० मध्ये जमिन संपादनापासून १ वर्षापर्यंत मोबदला अदा न केल्यास सदर मोबदला रकमेवर ९% व्याज देय आहे तसेच १ वर्षानंतरच्या कालावधीकरिता १५% इतकी रक्कम देय आहे. तथापी सदरचे व्याजदर आणि बँकेचे कर्जावरील व्याजदर मधील तफावत दूर करण्यासाठी याबाबत केंद्र शासनाच्या सहमतीने उक्त अधिनियामध्ये सुधारणा करावयाची बाब विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळोदा (जि.नंदुरबार) येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अक्कलकुवा येथे स्थलांतरित करण्याबाबत**

**(४०) ११५०७ (२१-०७-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलकुवा व धडगाव व तळोदा (जि.नंदुरबार) हे तीन तालुके या आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ३४ आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी तळोदा तालुक्यात फक्त आठ आश्रमशाळा कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयात सर्वाधिक काम जनतेचे व विद्यार्थ्यांचे असल्यामुळे हे प्रकल्प कार्यालय तळोदा ऐवजी अक्कलकुवा येथे झाले तर तीनही तालुक्याला सोयीचे ठरु शकेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अक्कलकुवा (१९२), धडगाव (१४३) व तळोदा (९४) तालुक्यात एवढी गावे असल्यामुळे या कार्यालयाचे स्थलांतर अक्कलकुवा या ठिकाणी झाले तर तिन्ही तालुक्यातील सोयीस्कर होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने (जि.नंदुरबार) येथे असलेले आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अक्कलकुवा येथे स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०९-०३-२०२६) :** (१) ए.आ.वि.प्र., तळोदा अतंर्गत ४२ शासकिय व २१ अनुदानित आश्रमशाळा असून त्यापैकी ८ शासकीय व ४ अनुदानित आश्रमशाळा तळोदा तालुक्यात आहेत.
(२), (३) व (४) ए.आ.वि.प्र., तळोदा अंतर्गत तळोदा, धडगांव व अक्कलकुवा या तीन तालुक्यांचा समावेश आहे. तळोदा येथे रस्ते, विज, कार्यालयाच्या अनुषंगाने इमारती इत्यादी सुविधा उपलब्ध आहे. तसेच धडगांव तालुक्यातील जनतेला व प्रशासकीय यंत्रणाना ये-जा करण्यासाठी चांदसैली घाटमार्गे तळोदा प्रकल्प कार्यालय हे मध्यवर्ती ठिकाण आहे. तसेच ते जिल्हा मुख्यालयापासून जवळ आहे. त्यामुळे प्रशासकीय व भौगोलिक दृष्ट्या, दळणवळ व इतर सुविधा लक्षात घेता तळोदा हे प्रकल्प कार्यालयाचे ठिकाण योग्य असल्याचे दिसून येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत येणा-या राज्यातील सर्व शाळांमध्ये प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) ११९०२ (२०-०७-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनेक शाळा दुर्गम भागत शहरापासून दूर असल्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांना ग्राऊंडवर खेळतांना दुखापत झाल्यास वा छोटा-मोठा अपघात झाल्यास त्यांच्यावर उपचार करण्यास गैरसोय होत असून उपचारास विलंब होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागांतर्गत येणा-या राज्यातील सर्व शाळांमध्ये प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२५ मध्ये सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) संबंधित शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक व सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचे मार्फत सर्व शासकीय निवासी शाळांमध्ये प्रथमोपाचार पेट्या ठेवण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जेष्ठ नागरिकांच्या मागण्यांबाबत**

**(४२) १२३३८ (२१-०७-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉमचे) सहा हजार संघ असून यात २० लक्ष सभासद असून ७० टक्के ज्येष्ठ ग्रामीण भागातील असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागण्यांत प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना मिळणा-या आर्थिक लाभाच्या योजना, सवलती वयाच्या ६० वर्षापासून लागू करणे, दारिद्र्यरेषेची अट काढून दरमहा ५/- हजार रुपये पेन्शन देणे, ६० वर्षावरिल ज्येष्ठ नागरिकांना महात्मा फुले जनआरोग्य योजना सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयात सुरु करण्याबाबत मागणी केली आहे, या मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विरंगुळा केंद्र, स्वतंत्र मंत्रालय, कलागुणांना वाव देण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ ,व विधानपरिषदेवर प्रतिनिधीत्व या प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील धोबी समाजाच्या आरक्षणाबाबत**

**(४३) १२३३९ (२१-०७-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धोबी समाजाला सवलती व आरक्षण देण्याबाबत डॉ.भांडे समितीने आपला अहवाल सन २००१ मध्ये दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनाने सन २०१९ मध्ये स्विकारला आहे तसेच या अहवालातील शिफारशीनुसार या समाजाला सवलती व आरक्षण देण्यात शासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार धोबी समाजाला तातडीने सवलती व आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) डॉ. डी. एम. भांडे समितीचा दिनांक ०५.०३.२००२ रोजीचा अहवाल व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून दिनांक १३.०५.२००२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अहवाल असे दोन्ही अहवाल मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक २१.०७.२००४ रोजीच्या निर्णयानुसार शासन पत्र, दिनांक १३.०४.२००५ अन्वये पुढील उचित कार्यवाहीस्तव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. तदनंतर, शासन पत्र, दिनांक ०४.०९.२०१९ अन्वये केंद्र शासनाकडे पुनश्च: पाठपुरावा करण्यात आला होता. त्यास अनुसरून केंद्र शासनाने दिनांक ०१.१०.२०१९ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार, शासन पत्र, दिनांक २२.१०.२०२१ अन्वये केंद्र शासनास सुधारित प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर, केंद्र शासनाने दिनांक २९.०६.२०२२ च्या पत्रान्वये अतिरिक्त मुद्यांची माहिती पाठविण्याबाबत कळविले असता, शासनपत्र, दिनांक २१.०९.२०२३ अन्वये अतिरिक्त माहिती केंद्र शासनास पाठविण्यात आली आहे. तदनंतर, केंद्र शासनाच्या दिनांक २७.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार शासन पत्र, दिनांक १४.०८.२०२५ अन्वये सुधारित अहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांची पदे बाहयस्त्रोताने भरण्यात येत असल्याबाबत

**(४४) १२३४६ (२१-०७-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागाने शासकीय आश्रमशाळेतील १७९१ शिक्षकांची पदे बाह्यस्त्रोताने भरण्याबाबतच्या ई-निविदेस दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासन आदेश काढून मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत तुटपुंज्या पगारावर नियुक्त होणारे शिक्षक दर्जेदार असून ते शिक्षण आदिवासी विद्यार्थ्यांना देऊ शकतील अशी शंका आदिवासी लोकांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात हजारो डी.एड., बी.एड., सी.ई.टी., टीईटी. पात्रता धारण करणारे सुशिक्षीत बेरोजगार नोकरीच्या शोधात असून आदिवासी विकास विभागात बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत शिक्षकांची भरती करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत भरती प्रक्रियेस अनेक आदिवासी संघटनेने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आदिवासी आश्रमशाळेची वाटचाल खाजगीकरणाकडे होत असल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (२९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) आदिवासी विकास विभागाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार शिक्षकांची नियमित पदे मंजूर आहेत. तथापि, पेसा क्षेत्रात पदभरती करण्यात येऊ नये याबाबत सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिल्या आहेत. त्यामूळे विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षकांच्या रिक्त जागा तात्पुरत्या स्वरुपात बाह्ययंत्रणेद्वारा भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. बाह्ययंत्रणेद्वारा गुणवत्तापूर्ण शिक्षकांची मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. तसेच शासनाने नॉन पेसा क्षेत्रातील शिक्षकांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार नियमित शिक्षक भरती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## नागपूर शहरातील तेलंगखेडी येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठच्या जमीनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत

**(४५) १२५१३ (१९-०८-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील फुटाळा तलावाच्या कॅचमेंट क्षेत्रातील खसरा क्र.२०, मौजा तेलंगखेडी येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे अतिक्रमित करून एका भूमाफियाने दोन इमारती,फंक्शन लॉन, जनावरांचे शेड, हातठेले ठेवण्यासाठी गोडाऊन, बुकिंग कार्यालय, मंदिर इत्यादी अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत नागपूर महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांना फंक्शन लॉन तीन दिवसांत हटविण्याबाबत तसेच न्यायालयीन स्थगनादेश उठविणे, तसेच कॅचमेंट क्षेत्रात कंपाउंड वॉल बांधून ते संरक्षित करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिक्रमण करणाऱ्या भूमाफियांकडून बनावट शासकीय कागदपत्रे तयार करण्यात आली असून, या संदर्भात सिटी सर्वे क्र.३ कार्यालयात एफआयआर नोंदविण्याची तक्रार करण्यात आली होती, तथापि याबाबत अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरविकास विभागाने MRTP कायद्यान्वये बजावलेल्या नोटीसवर स्थगिती दिली असून, याआधीच सिव्हिल कोर्ट आणि जिल्हा व सत्र न्यायालयांनीही या प्रकरणावर स्थगिती दिली असून अशा दोन न्यायिक यंत्रणांकडून एकाचवेळी स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त फुटाळा तलावाजवळील अनधिकृत बांधकाम हटविण्यासंदर्भात व यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१०-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) भुमापन कार्यालय, नागपूर यांच्या कार्यालयाने कागदपत्रांवर कुठेही खाडाखोड केल्याचे दिसून येत नसल्याचे विद्यापीठास कळविले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) अतिक्रमणकर्त्याने नागपूर महानगरपालिकेच्या आदेशाविरुध्द सिव्हिल कोर्ट आणि जिल्हा व सत्र न्यायालयाकडे तसेच मा. मंत्री (नगर विकास) यांच्याकडे अपिल दाखल केले असून, सदर आदेशावर असलेली स्थगिती उठविण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलासंदर्भात समिती गठीत करुन त्यावर केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत

**(४६) १२६१३ (१९-०८-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९६४ मध्ये ९.२३ लाख हेक्टर जमीन भूमी झुडपी जंगल क्षेत्राचा भाग असून त्यापैकी ६.५५ लाख हेक्टरला संरक्षित वा आरक्षित वनभूमी दर्जा दिला असून उर्वरित २.६८ लाख हेक्टर जमिनीपैकी ९२,१२५ हेक्टर जमीन वनीकरण योग्य राखून १,७६,००० हेक्टरपैकी ८९,७६८ हेक्टर जमीन सन १९९२ पर्यंत अयोग्य कामासाठी घेऊन उर्वरित ८६,४०९ हेक्टर जमीन कायदेशीर वादामुळे प्रलंबित होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ डिसेंबर, १९९६ रोजीच्या न्यायालयीन निर्णयाच्या धर्तीवर विदर्भातील सहा जिल्ह्यांतील झुडपी जंगल परिभाषित करण्याचे तसेच महसूल खात्याच्या अखत्यारीत असलेली वनभूमी खाजगी संस्था व्यक्तींना दिली असून सदर पडताळणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांची विशेष पथक गठित करण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन करण्यात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या आरक्षित झुडपी जंगलावर सन १९८० नंतरची अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत समिती गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) : (१)** होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

शासन पत्र दिनांक २३ डिसेंबर, २०२५ अन्वये, विशेष तपास पथक स्थापन करणेबाबत सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(३) शासन पत्र दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ अन्वये Special Task Force च्या संरचनेस आणि अटी व शर्तीस मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जामखेड, (जि. अहिल्यानगर) वसतीगृहातील इयत्ता आठवीतील लहान मुलांना केलेली अमानुष मारहाण

**(४७) १२६५५ (१९-०८-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील अनुसूचित जाती-जमाती आणि नवबौध्द शासकीय निवासी शाळेतील इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांना वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी लाथा बुक्यांनी व पट्टयाने अमानुष मारहाण केल्याबाबतचे दिनांक २१ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहातील लहान मुलांना अमानुष मारहाण केल्याची माहिती मिळूनही मुख्याध्यापक, शिक्षक व पोलीसांनी हा गंभीर प्रकार खाजगी प्रकरण भासवून मिटविण्याचे प्रयत्न केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्ञानार्जन करणाऱ्या या लहान मुलांना त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व वसतीगृह व्यवस्थापनाच्या विश्वासावर ठेवतात परंतू शाळेचे प्रशासन अशा घटना घडू नयेत यासाठी प्रयत्न करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या उक्त घटनेसाठी जबाबदार

मुख्यध्यापक, शिक्षक व व्यवस्थापन यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
मुख्याध्यापक व प्रभारी अधिक्षक यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) शहरातील मिळकतीचे वर्ग-२ नियमानुकूल झालेल्या मिळकती वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत

**(४८) १२९४४ (१९-०८-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) शहरातील ९१७ मिळकतीचे वर्ग-२ नियमानुकूल झालेल्या मिळकती वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून कुर्डूवाडी शहर व्यापारी संघटना, मिळकतधारक नागरीक यांच्याकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अद्यापही प्रलंबित असलेल्या मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीवर बांधकाम परवाना, बँकेचे कर्ज तसेच खरेदी-विक्रीचे व्यवहार होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करुन उक्त ९१७ मिळकतीचे वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे मा.महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १३/०४/२०१७ व दिनांक २३/०२/२०१८ अन्वये पुनर्विकास/पुनर्बांधकामासाठी, शासन निर्णय दिनांक ०५/०७/२०२३ अन्वये हस्तातंरणाबाबत परवानगी व शासन निर्णय दिनांक. १६/०६/२०१६ व दिनांक २६/०६/२०१८ अन्वये गहाणखत करणेसाठी अतिक्रमण नियमित केलेल्या मिळकत धारकांचे प्राप्त अर्जानुसार परवानगी देणेची कार्यवाही करणेत येत आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
त्यानुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत दिनांक २८/०६/२०२५ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेण्यात आली असून, प्रकरणी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख सोलापूर, तहसिलदार माढा व उप अधीक्षक, भूमि अभिलेख माढा यांना भाडेपट्टा नुतणीकरणाचे अनुषंगाने अभिलेखाचा शोध घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सबब प्रकरणी कागदपत्राची तपासणी करुन नियमानुसार भोगवटादार वर्ग २ चे भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरण करण्यातची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूम-परंडा-वाशी (जि.धाराशिव) या तालूक्यातील नागरीकांची महसूल विभागातील अनेक प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत

**(४९) १२९५० (१९-०८-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम-परंडा-वाशी (जि.धाराशिव) या तालूक्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणे, ई-फेरफार, ई-चावडी, ७/१२ चा अहवाल, शेतरस्ते इत्यादी नागरीकांना सेवा पुरविण्याबाबतची महसूल विभागातील प्रकरणे मोठया प्रमाणात जिल्हास्तरावर प्रलंबीत असल्याचे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकाऱ्यानी आढावा बैठक घेऊन सर्व प्रलंबीत प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यांबाबतचे निर्देश अधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागातील प्रलंबीत प्रकरणांना विलंब होत असल्यामुळे नागरीकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून परिणामी दुष्काळग्रस्त असलेल्या जिल्हयातील नागरीकांची प्रगती धिम्यागतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी हेतुपुरस्कर (जाणून बुजून) महसूल विभागातील नागरीकांची प्रकरणे मुदतीत निकाली न काढणा-या संबधीत दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-११-२०२५) :** (१) व (२) दिनांक १६ मे, २०२५ च्या कालावधीत महसूल विभागाशी संबंधित शेतकरी आत्महत्येची २५ ई-फेरफारची १४ व शेतरस्तेची २९ प्रकरणे प्रलंबित होती.

सदर प्रकरणापैकी शेतकरी आत्महत्येची सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. ई-फेरफारमध्ये मुदत संपलेल्या विवादग्रस्त व अविवादग्रस्त प्रलंबित नोंदी संख्या १४ असून यामध्ये विवादग्रस्त प्रकरणात न्यायालयीन वाद चालू असल्यामुळे प्रलंबित आहेत. तर शेतरस्तेच्या प्रलंबित २९ प्रकरणापैकी १५ प्रकरणात आदेश झाले असून १४ प्रकरणे सुनावणीस्तरावर आहेत.

तसेच साप्ताहिक बैठकीत प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिलेले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील महसूल विभागाच्या ताब्यातील झुडपी जमीन ही वन जमीन असल्याबाबत

**(५०) १२९५२ (१९-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील महसूल विभागाच्या ताब्यातील झुडपी जमीन ही वन जमीन म्हणून समजली जाईल, असा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे मे, २०२५ मध्ये दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्व विदर्भातील नागपूर, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात

झुडपे, जंगले व महसूल विभागाच्या ताब्यात असून या जमिनीवर अनेक वर्षांपासून स्थानिक शेतकरी, गावे व ग्रामपंचायती यांनी विकास कामे व उपजिविकेची साधने उभारली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन वन विभागाकडे हस्तांतरित केल्यास रस्ते, शाळा, पाणीपुरवठा योजना, आरोग्य केंद्रे व पर्यटन प्रकल्प अशा विविध विकास कामांसाठी जमीन उपलब्ध होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने योग्य निर्णय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार, महसूल विभागाच्या ताब्यातील झुडपी जंगल जमिनी वनविभागास हस्तांतरीत झाल्यानंतरही वन संवर्धन कायदा, १९८० चे कलम ३(२) नुसार रस्ते, शाळा, पाणीपुरवठा योजना, आरोग्य केंद्रे अशा विविध कामांसाठी वनविभागाकडून जमीन उपलब्ध होणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.